## दिनांक ०६-०४-२०२३ रोजी आयोजित राज्य तांत्रिक समितीच्या तिस-या सभेचे इतिवृत्त

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना- पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्यस्तरीय तांत्रिक समितीची दुसरी बैठक दि. ०६-०४-२०२३ रोजी आयुक्त, मृद व जलसंधारणतथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांचे अध्यक्षतेखाली सकाळी ११.०० वा. पार पडली. सदर बैठकीस खालील समिती सदस्यउपस्थित होते.

| अ. क्र | अधिकारी | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री मधुकर अर्दड | आयुक्त,मृद व जलसंधारणतथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.०(ऑनलाइन व्हीसी द्वारे) |
| २ | श्री सुनील चव्हाण | आयुक्त कृषि, कृषि आयुक्तालय, पुणे |
| ३ | श्री सू. म. काळे | सह सचिव, मृद व जलसंधारण, मंत्रालय मुंबई. |
| ४ | श्री एम एल चपळे | प्रतिनिधी, आयुक्त, मनरेगा, नागपूर |
| ५ | श्री चिंतामणी जोशी | संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे |
| ६ | श्री कविजीत पाटील | प्रतिनिधी, अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता (मृद व जलसंधारण) (ऑनलाइन व्हीसी द्वारे) |
| ७ | डॉ. संजय पाटील | प्रमुख, सुदूर संवेदन उपाय योजना केंद्र, पुणे |
| ८ | श्री रविंद्र भोसले | अपर मुख्य कार्यकारी अधिकारी,वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा २.० तथा संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे |

सदर बैठकीस १४४ प्रकल्पापैकी २२प्रकल्पांचे प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांना सविस्तर प्रकल्प आराखडा सादरीकरण व तपासणीसाठी उपस्थित राहण्याच्या सूचना होत्या.परंतु प्रत्यक्ष खालील प्रमाणे २० प्रकाय (PIA) उपस्थित होते. तसेच संबंधित जिल्ह्यातील गोंदिया वगळता सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी उपस्थित होते.

१. सिंधुदुर्ग - ७
२. रत्नागिरी - २
३. नंदुरबार - ४
४. लातूर - २
५. गोंदिया - ३
६. सोलापूर - २

बैठकीच्या सुरुवातीला उपस्थित सर्वांचे सदस्य सचिव तथा अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे यांनी स्वागत केले. त्यानंतर सविस्तर प्रकल्प अहवाल सादरीकरण व तपासणी या मुद्यांच्या अनुषंगानेप्रास्ताविक केले. राज्यस्तरीय तांत्रिक समितीच्या बैठकीच्या पुर्वी दिनांक ०५-०४-२०२३ रोजी DPR तपासणीसाठी नेमलेल्या ५ गटांच्या माध्यमातून तांत्रिक दृष्ट्या तपासणी करण्यात आली. DPR तयार करताना एकूण प्रकल्प मुल्याच्या ४७% NRM कामे ही प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० मधून घेणे व उर्वरित कामे मनरेगा अथवा इतर निधीमधून घ्यावीत अशा सूचना अपर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या. मा. आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्वांना DPR सादरिकरणाबाबतमार्गदर्शन केले.

शिवार फेरी करून लोकसहभागाद्वारे Net planning करणेत यावी. त्यानंतर मृद व जलसंधारण कामे निवड करण्यात यावी. भूमिहीन लाभार्थी/ उपजीविका, उत्पादन पद्धतीसाठी लाभार्थी निवड ही ग्रामसभेद्वारे करण्यात यावी अशा सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या. तसेच SLTC च्या बैठकीत DPR चे सादरीकरण हे जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनीच करावे अशाही सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या.

शिवाय यापुढे DPR मान्यतेची प्रक्रिया वसुंधरा कार्यालयाने ठरविलेल्या कार्यपद्धतिनुसार चालेल ज्यात SLTC च्या पुर्वी वसुंधरा कार्यालयातील टीमद्वारे DPR ची सखोल तपासणी करून त्यातील त्रुटी प्रकाय यांना सांगणेत येतील, त्या त्रुटी प्रकाय यांनी दुरुस्त कराव्यात व जे प्रकाय या त्रुटी दुरुस्त करतील त्यांचे डीपीआर चे सादरीकरण SLTC मध्ये करण्यात यावे आणि त्यानंतर DPR मान्यता होईल असेही अध्यक्षांनी उपस्थित प्रकाय व जिल्हा जलसंधारण अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

**मुद्दा क्रं. १**-जिल्हा जलसंधारण अधिकारी, नंदुरबार श्री रविंद्र खोडे यांनी नंदुरबार मधील Nandurbar (WDC-२.०)/४/२०२१-२२ या प्रकल्पाचा DPR सादरीकरण केला. परंतु जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्राच्या इतिवृत्तावर जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याने व सर्व राज्यस्तरीय तांत्रिक समिती सदस्यांना सादरीकरणाच्या माहिती पुस्तिका उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना माहिती पुस्तिका दिल्या गेल्या नाहीत. त्यामुळे त्यांनी पुढच्या SLTC बैठकीत परिपूर्ण DPR चे सादरीकरण करावे अशा सूचना अध्यक्षांनी दिल्या. यावर मा. संचालक GSDA यांनी ज्या जिल्ह्यांच्या इतिवृत्तावर जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी आहे त्यांचेच सादरीकरण घेणेत यावे असे सूचितकेले.

**मुद्दा क्रं. २** - जिल्हा जलसंधारण अधिकारी,सिंधुदुर्ग व रत्नागिरीश्री सुहास गायकवाड यांनी सिंधुदुर्ग चे DPR सादरीकरण केले. परंतु सदर DPR मध्ये netplanning चुकल्यामुळे तसेच पाणलोट समिती सदस्यांची नावे नमूद नसलेमुळे पुढच्या SLTC बैठकीमध्ये परिपूर्ण DPR चे सादरीकरण करण्याच्या सूचना समितीने दिल्या.

WCDC ने DPR ला मान्यता देताना सखोल तपासावा व SLTC समोर सादर करणेस योग्य आहे असे इतिवृत्तात नमूद करावे अशा सूचना मा. अध्यक्षांनी दिल्या.

**मुद्दा क्रं. ३** – जिल्हा जलसंधारण अधिकारी, गोंदिया अनुपस्थित असल्याने त्या जिल्ह्यातील DPR चे सादरीकरण करून घेण्यात आले नाही व त्यांना पुढील SLTC बैठकीत जिल्हा जलसंधारण अधिकारीयांनी PIA च्या उपस्थितीत DPR सादरीकरण करावे अशा सूचना देण्यात आल्या.

**मुद्दा क्रं. ४** – जिल्हा जलसंधारण अधिकारी, सोलापूर श्री. दामा दयासागर यांनी पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्राची बैठक दिनांक ०५-०४-२०२३ रोजी संपन्न झाल्याचे समितीला सांगितले. या बैठकीच्या इतिवृत्तावर जिल्हाधिकारी यांची स्वाक्षरी नसल्याने त्यांनी देखील पुढील SLTC बैठकीत DPR सादरीकरण करावे अशा सूचना देण्यात आल्या.

**मुद्दा क्रं. ५** – जिल्हा जलसंधारण अधिकारी, लातूर श्री अनिल कांबळे यांनी लातूर मधील ३ प्रकल्पांपैकी प्रकल्प क्रमांक Latur(WDC२.०)/२/२०२१-२२ तालुका उदगीर या प्रकल्पातील सर्व मौजे १. वाढवना (खु.) २. सुकणी ३. देऊळवाडी ४. चौंडी ५. कोदळी ६. बेलसक्करगा ७. धोंडीहिप्परगा असे एकूण ७ गावे PMKSY१.०(IWMP१) मधील पुंनरावृत्ती झालेली गावे आहेत. त्यामुळे सदरचा प्रकल्प रद्द होत असून त्याला जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्राची मान्यता घेण्यात आल्याचे समितीला सांगितले.

प्रकल्प क्रमांक Latur(WDC२.०)/१/२०२१-२२ तालुका निलंगा मधील लांबोटा हे गाव PMKSY१.०(IWMP१) मधील पुंनरावृत्ती झालेले आहे. त्याचबरोबर याच प्रकल्पातील निलंगा ग्रामीण हे गाव शहरात समाविष्ट असल्याने प्रकल्पातून वगळण्यात आलेले आहे. अशा प्रकारे लांबोटा व निलंगा ग्रामीण ही २ गावे Latur(WDC२.०)/१/२०२१-२२ या प्रकल्पातून वगळणे बाबत जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्राची मान्यता घेण्यात आल्याचे जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी सांगितले. परंतु PPR तयार करताना या २ गावांमधील क्षेत्राचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे PPR व DPR मधील क्षेत्रात कोणताही बदल झालेला नाही असे त्यांनी समितीला सांगितले.

लातूर जिल्ह्यातील सादरीकरण करण्यात आले. विहीर पुनर्भरण सारख्या कामाचा समावेश करण्याबाबत समितीने सूचना दिल्या. सामितीने दिलेल्या सूचनांचा अंतर्भाव करून लातूर जिल्ह्यातील औसा व निलंगा या प्रकल्पांना सामितीने मान्यता दिली.

मा. कृषि आयुक्त यांनी DPR चांगले तयार झाले तरच योजना चांगली राबविता येईल असे उपस्थितांना सांगितले. पाणलोट क्षेत्रातील उपचाराचे आयुष्यमान याबाबत जलसंधारण विभागाच्या २०१३ च शासन निर्णय सर्वांनी अभ्यासणे बाबत त्यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे मा. आयुक्त कृषि यांनी खालीलप्रमाणे सूचना केल्या.

DPR बनवितांना प्रत्यक्षात शिवार फेरी करणे, लोकांशी संवाद करणे, ग्रामसभा इ. प्रत्यक्षात घेणे गरजेचे असून DPR करताना हे घडले की नाही हे पडताळणीचे निकष लावण्याच्या सूचना त्यांनी केली. हे करताना Date-Time सहित Geo-tagफोटोDPR ला जोडावेत.

DPR तयार करताना शिवार फेरी दरम्यान पूर्वीचे झालेले उपचार यांची सद्यस्थिति काय याची माहिती घेणे आवश्यक असून ज्या स्वयंसेवी संस्था DPR तयार करत आहेत त्यांनी क्षेत्रीय स्तरावर फिरून DPR तयार करावा. याबरोबरच वनीकरणाकडेही लक्ष देणे गरजेचे असून वने हे upper

reaches मध्ये असतात तेथेही उपचार घेणे महत्वाचे आहे. उपजीविका तसेच उत्पादन पद्धती यामध्ये लाभार्थी निवड करताना ग्रामस्थांसोबत चर्चा करावी व यात ग्रामसेवकाचा सहभागही महत्त्वाचा आहे.उपजीविका संबंधात काम करताना त्या क्षेत्रात कुठले उपक्रम घेणे शक्य आहे याबाबत बँक मॅनेजर, पशुसंवर्धन अधिकारी इ. शी चर्चा करावी.

सहसचिव यांनी सादरीकरण करणेआधी PIA ना checklist द्यावी व त्या आधारे सादरीकरण घेणेत यावे अशा सूचना दिल्या. सादरीकरण आटोपशीर असावे असे त्यांनी सांगितले.त्रुटी असतील तर असे DPR SLTC समोर सादर करू नयेत अशी सूचना त्यांनी दिली. शिवाय ग्रामसभेच्या व इतर सर्व आवश्यक मान्यता घेतल्यानंतरच DPR SLTC मध्ये मान्यतेसाठी सादर करण्याच्या सूचना सहसचिवांनी दिल्या.

तसेच पुढील बैठकीच्या आधी बैठकीत सादरीकरण होणा-याDPR च्या सादरीकरणाच्या soft copy सदस्यांना बैठकीच्या अगोदर पाठविण्यात याव्यात जेणेकरून त्याचा सदस्य अभ्यास करतील अशी सूचना मा. आयुक्त, GSDA यांनी मांडली.

बैठकीच्या शेवटी DPR तयार करताना PIA यांनी अधिक लक्ष देण्याची गरज आहे असे अध्यक्षांनी नमूद केले. तसेच येणा-या अडचणी लक्षात घेऊन कामाचे नियोजन करावे व जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी DPR स्वतः लक्ष घालून तपासावेत अशा सूचना अध्यक्षांनी दिल्या. तसेच मा. अपर मुख्य सचिव महोदयांनी DPR संदर्भात व इतर कामाबाबत दिलेल्या सुचनांनुसार वेळेत कामे पूर्ण होतील असे नियोजन करावे अशा अध्यक्षांनी सूचना दिल्या.

तसेच DPR मान्यतेसाठी WCDC च्या बैठका आयोजित करणे तसेच त्यानंतर बेठकीच्या इतिवृत्तावरस्वाक्षरी घेणे इ. बाबत सर्व जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांच्या सतत संपर्क राहून व समन्वय ठेवून कामकाज करणेबाबत मा. अध्यक्षांनी सूचित केले.

बैठकीच्या शेवटी सदस्य सचिव तथा अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उपस्थितांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या मान्यतेने बैठक संपल्याचे जाहीर केले.

(रविंद्र भोसले)
अपर मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा,
(प्र.कृ.सि.यो २.०), महाराष्ट्र राज्य, पुणे.

मधुकर अर्दड(भा. प्र. से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा२.०, तथा
आयुक्त मृद व जल सांधरण (म.रा.), वाल्मी
परिसर, औरंगाबाद